# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः19.12.2025** **वारःशुक्रवार**

---

- भारत आणि ओमानदरम्यान सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार

- विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी अभियान विधेयकाला संसदेची मंजुरी

- ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार आणि,

- भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात अहमदाबादमध्ये 20 षटकांच्या मालिकेतला आज अखेरचा सामना

**<u>मोदी</u>**

भारत आणि ओमान यांच्या दरम्यान काल सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ओमान भेटीदरम्यान वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आणि ओमानमधील समपदस्थ मंत्र्यांनी मस्कत इथं यावर स्वाक्षरी केली. दोन्ही देशांमध्ये शिक्षण, सागरी व्यापार, कृषी क्षेत्राशी संबंधित विविध सामंजस्य करारही करण्यात आले. भारत आणि ओमान यांच्यातील बंध जुने असल्याचं मोदी यावेळी म्हणाले. भारत ओमान यांच्यातील दृढ संबंधांचं प्रतिक म्हणून ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक यांनी मोदी यांना “ऑर्डर ऑफ ओमान” हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान केला. तीन देशांचा दौरा आटोपून पंतप्रधान मोदी काल मायदेशी परतले.

**<u>जीरामजी</u>**

विकसित भारत ग्रामीण रोजगार हमी आणि उपजीविका अभियान अर्थात विकसित भारत जी राम जी विधेयक संसदेत काल मंजूर झालं. परवा लोकसभेत मंजूर झालेल्या या विधेयकाला काल राज्यसभेचीही मंजूरी मिळाली.

विकसित भारत २०४७ या उद्दीष्टपूर्तीच्या अनुषंगानं ग्रामीण विकासाचा आराखडा तयार करण्यासाठी हे विधेयक संसदेत सादर करण्यात आलं. या विधेयकानुसार आता ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी दिली जाईल. याद्वारे त्या कुटुंबातील प्रौढ अकुशल व्यक्तींना रोजगार मिळेल. या रोजगार

निधीमध्ये केंद्र सरकारचा ६० टक्के तर राज्यांचा ४० टक्के वाटा असेल. केवळ ईशान्येकडील आणि हिमालयातील राज्यांसाठी केंद्र सरकार ९० टक्के निधी देणार आहे.

राष्ट्र प्रथम या तत्वानुसार केंद्र सरकार काम करत आहे. गावांचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही असं केंद्रिय ग्राम विकास मंत्री शिवराज सिंग चौहान या विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना म्हणाले.

दरम्यान, हे विधेयक मागे घ्यावं, या मागणीसाठी काल सकाळी विरोधी पक्ष सदस्यांनी संसद भवन परिसरात निदर्शनं केली. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचं नाव पुसण्याचा प्रयत्न सरकार करत आहे, असा आरोप विरोधी पक्षाकडून करण्यात आला.

**<u>संसद</u>**

अणुऊर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती विधेयक, 2025 म्हणजेच शांती विधेयकाला काल संसदेनं मंजुरी दिली. राज्यसभेमध्ये काल चर्चेनंतर ह्या विधेयकाला मान्यता देण्यात आली. लोकसभेत हे विधेयक या आधीच मान्य करण्यात आलं होतं. अणु उर्जा क्षेत्रातली सुरक्षितता अधिक भक्कम करणं, दर्जा सुधारणं आणि आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी यंत्रणा बळकट करणं हा या विधेयकाचा उद्‌देश आहे.

**<u>वृक्षतोड</u>**

नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात साधुग्राम उभारण्यासाठी तपोवनातल्या वृक्षतोडीला मुंबई उच्च न्यायालयानं 14 जानेवारीपर्यंत स्थगिती दिली आहे. नाशिकमधल्या एका नागरिकानं या संदर्भात दाखल केलेल्या जनहित याचिकेवर काल उच्च न्यायालयात तातडीची सुनावणी झाली. तपोवनातली ही झाडं 30 ते 40 वर्षं जुनी असून ती नाशिकला प्राणवायूचा पुरवठा करतात. त्यामुळे साधुग्रामच्या निर्मितीसाठी अन्यत्र जागा उपलब्ध करून द्‌यावी अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. या याचिकेची दखल घेऊन न्यायालयानं सर्व प्रतिवादींना नोटीस बजावली असून येत्या 14 जानेवारीपर्यंत वृक्षतोडीला स्थगिती दिली आहे.

**<u>माणिकरावकोकाटे</u>**

सदनिका घोटाळा प्रकरणी मंत्री माणिकराव कोकाटे यांना नाशिक जिल्हा आणि सत्र न्यायालयाने दोषी ठरवल्यानंतर काल त्यांनी आपला राजीनामा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सुपूर्द केला. हा राजीनामा पुढील प्रक्रियेसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठवल्याचं पवार यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>राम-सुतार</u>**

ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांच्या पार्थिव देहावर काल उत्तरप्रदेशातल्या नोएडा इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. राम सुतार यांचं काल दिल्लीत वृद्धापकाळानं निधन झालं. ते 100 वर्षांचे होते. जगातील सर्वात उंच पुतळा असलेल्या 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'चे शिल्पकार असलेल्या सुतार यांना या शिल्पानं जागतिक कीर्ती मिळवून दिली होती. सुतार यांना पद्मश्री, पद्मभूषण, टागोर सांस्कृतिक पुरस्कार यासारखे अनेक सन्मान प्राप्त झाले होते. गेल्याच महिन्यात त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं.

राम सुतार यांना काल राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी आदरांजली वाहिली. “जागतिक कीर्तीचे महान शिल्पकार राम सुतार यांनी ‘स्टॅच्यू ऑफ युनिटी’सह अनेक ऐतिहासिक शिल्पांच्या माध्यमातून भारताची ओळख जागतिक पातळीवर नेली. त्यांच्या निधनानं कला क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. हुबेहूब आणि जिवंतपणा हे त्यांच्या कलेचं वैशिष्ट्य होतं. त्यांची शिल्पं ही त्यांच्या महान कार्याची नेहमी साक्ष देतील.” असं रावल यावेळी म्हणाले.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही सुतार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

अहिल्यानगरमधील शिल्पकार प्रमोद कांबळे यांनी राम सुतार यांच्याबद्दल आकाशवाणीजवळ आपल्या भावना व्यक्त केल्या....

**<u>अमावस्या</u>**

मार्गशीर्ष अमावस्या किंवा वेळा अमावस्या हा शेतकऱ्यांचा सण आज साजरा होत आहे. ऐकुया, या सणाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**<u>स्क्रिप्ट</u>**

लातूर जिल्ह्यात शेतकऱ्यांचा पारंपरिक आणि निसर्गाशी नातं जपणारा सण 'दर्शवेळा अमावस्या' मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. या दिवशी शहरं ओस पडलेली दिसतात, तर शेत-शिवार माणसांनी फुलून गेलेली असतात. यावर्षी झालेल्या अतिवृष्टीनंतर आता रब्बी हंगाम जोरात सुरू असून, या हंगामातून शेतीमालाचे अधिकाधिक उत्पन्न मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांना आहे. याच पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांकडून हिरव्यागार पिकांची पूजा केली जाते. कडब्याचा कोप तयार करून त्यात पाच पांडव, लक्ष्मी तसेच शेतात आलेल्या धान्याची मनोभावे पूजा केली जाते. यानंतर शेतकरी बांधव आपल्या शेतात कुटुंब, नातेवाईक आणि मित्रांसोबत वनभोजनाचा आनंद घेतात. ज्यांना शेती नाही अशांनाही खास या वनभोजनाचे आमंत्रण दिले जाते. तर अनेक जण वेळा अमावस्येच्या पारंपरिक पदार्थांचा आनंद उद्यानात जाऊन घेतात.या दिवशी काळ्या आईची लक्ष्मी म्हणून पूजा केली जाते. अंबिल, ज्वारी-बाजरीचे उंडे, भज्जी, धपाटे, तिळाच्या पोळ्या, वांग्याचे भरीत अशा खास गावरान पदार्थांची मेजवानी असते. संपूर्ण लातूर धाराशिव जिल्हा...बीड आणि सोलापूर जिल्ह्यातील बहुतांश भाग तसेच कर्नाटक सीमाभागात हा सण शेतकऱ्यांचा उत्सव म्हणून ओळखला जातो. सर्व जाती-धर्मातील नागरिक शेताकडे वळल्याने अनेक गावांत संचारबंदी सदृश्य शांतता दिसून येते. निसर्गाची हानी न करता माणसाला निसर्गाशी जोडणार वेळा अमावस्या हा शेतकरी आणि निसर्गाच्या अतूट नात्याचा उत्सव आहे. दरम्यान, 'दर्शवेळा अमावस्या' निमित्त लातूर जिल्ह्यात आज स्थानिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

**<u>माळेगाव-यात्रा</u>**

नांदेड जिल्ह्यातल्या श्रीक्षेत्र माळेगाव इथं 'येळकोट येळकोट जय मल्हार' अशा जयघोषात बेलभंडा-याची उधळण करीत पारंपरिक पध्दतीनं श्रीखंडोबा रायाच्या यात्रेस काल सुरवात झाली. लाखो भाविकांनी पालखीचं दर्शन घेतलं. दुपारी पालखी पूजनानंतर देव स्वारी काढण्यात आली. वाघ्या मुरळीला बघण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

**<u>अल्पसंख्याक-हक्क-दिवस</u>**

राज्यात काल सर्वत्र अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा करण्यात आला. संयुक्त राष्ट्र संघटनेनं राष्ट्रीय, धार्मिक, वांशिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचा जाहीरनामा 1992 मध्ये या दिवशी स्वीकारला. अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची

संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा यांचं जतन आणि संवर्धन करण्याचा अधिकार असून या अधिकाराची प्रभावी अभिव्यक्ती व्हावी या उद्देशानं हा दिवस साजरा करण्यात येतो.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातल्या 20 षटकांच्या मालिकेतला पाचवा आणि अंतिम सामना आज अहमदाबादमध्ये होत आहे. चौथा सामना धुक्यामुळे रद्द झाल्यानंतर भारत या मालिकेत 2 – 1 आघाडीवर आहे. आता पाचव्या सामन्यात दक्षिण आफ्रिका बरोबरी साधण्यात यशस्वी होणार का भारत निर्विवाद विजय मिळवणार याची उत्सुकता क्रिकेटप्रेमींना आहे.

**<u>हवामान</u>**

राज्यात सर्वत्र हवामान कोरडं असून उद्याही असंच हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.